# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/03/2023 (सोमवार) सायंकाळ

---

## जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. उमरेड** :– दिनांक ०५/०५/२०२१ चे १८:३१ वा दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे अप. क्र. ३१५/२०२१ कलम ३७६, (अ, ब), ३७६ (एफ) (जे), ३२३, भादवि सहकलम ४, ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०३/०५/२०२१ चे ११:३० वा. ते ०४/०५/२०२१ चे ०४:०० वा. दरम्यान फिर्यादी व आरोपी नामे– जगदिश परदेशी राठोड, वय ३२ वर्ष रा. अभ्यंकर चौक ईतवारीपेठ उमरेड हे पती –पत्नी आहे. पिडीता ही फिर्यादी व आरोपीची मुलगी आहे. नमुद घटना वेळी व ठिकाणी फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये दारू पिण्याच्या कारणावरून भांडण झाल्याने फिर्यादी ही रागाने पिडीता व मुलाला घेवुन शेजारच्या घरी गेली. त्यानंतर आरोपीने पिडीतेला (स्वत:च्या मुलीला) सोबत घेवुन गेला. फिर्यादीने पिडीतेस दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी लैगिंक अत्याचार झाल्याचे सांगितले फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरण्याचे तपास पोउपनि. मिरा मटाले पो.स्टे. उमरेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक २७/०३/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश यांनी वरील नमुद आरोपीला सदर गुन्हयात कलम ३७६ (अ, ब) भादंवि मध्ये २० वर्ष सश्रम कारावास व १०,०००/– रू. दंड, दंड न भरल्यास १ वर्ष सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोना/४८७ माधव काळे पो.स्टे. उमरेड यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**